# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर*
*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.*
*फोन नं.२६४७ ४८१२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६११*

ई-मेल- jtdirrom@gmail.com संकेतस्थळ - www.jdteromumbai.com


क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-४/२०१५/ 2067
दिनांक 13 JUL 2017.

प्रति,
प्राचार्य,
सर्व संबधित संस्था,
(सोबतच्या यादी प्रमाणे)

विषय — रि वेरा इंस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, खारघर, नवी मुंबई ही संस्था बंद झाल्यामुळे संस्थेतील विद्यार्थ्यांचे अन्य संस्थेमध्ये स्थलांतराने प्रवेश निश्चितीबाबत.
संदर्भः-१. मा. संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/विद्यार्थी बदली /२०१७/३५७९ दि.२३.०७.२०१७

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, रि वेरा इंस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, खारघर, नवी मुंबई हया तंत्रनिकेतन या संस्थेतील इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. व इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम बंद झाल्याने तृत्तीय वर्षा करीता पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना या विभागा अंतर्गत विनाअनुदानीत पदवीका अभ्यासक्रमाच्या संस्थेत स्थलांतरीत करण्यासाठी संचालनालयाने संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे आपल्या संस्थेतील संबधित अभ्यासक्रमास (रि वेरा इंस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, खारघर, नवी मुंबई ) त्यांनी दिलेल्या विकल्पा नुसार व गुणवत्तेनुसार संस्थास्थलांतर देण्यास खालील अटि व शर्तीनुसार संस्था स्थलांतराने प्रवेश देण्याचे या कार्यालयामार्फत निर्देश देण्यात येत आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चे उर्वरित शैक्षणिक कामकाज जसे सत्र कार्य पुर्ण करुन घेणे. परीक्षा अर्ज स्विकारणे इत्यादि बाबी स्थलांतरीत संस्थेमार्फत पुर्ण करण्यात यावे पुढील शैक्षणिक सत्रात अधिकचे वर्ग झाल्यास संबधित संस्थेने तंत्रशिक्षण परिक्षा मंडळाशी संपर्क साधुन तसे अधिकच्या वर्गाचे आयोजन करावे.
२. स्थलांतरीत केलेल्या संस्थेचे लागु असलेले शैक्षणिक शुल्क वर नमुद केलेल्या प्रमाणात शैक्षणिक वर्ष शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून नियमानुसार विद्यार्थ्यांना स्थलांतरीत संस्थेत भरणे आवश्यक राहील.तसेच त्यांना शैक्षणिक सवलती मिळत असल्यास यापुढेही सुरु राहतील (मागास वर्गीय विद्यार्थी, टी.एफ.डब्ल्यु.एस. अंतर्गत व इतर)
३. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे स्थलांतर तंत्रशिक्षण परिक्षा मंडळाच्यां नियमाच्या अधिन राहून करण्यात येत आहे. आपल्या संस्थेमध्ये स्थलांतरीत केलेल्या विद्यार्थ्यांपैकी जे अनुतीर्ण ( नसलेल्या/ड्रापआऊट) आहेत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज हे आपल्या संस्थेमार्फत स्विकारुन म.रा. तंत्रशिक्षण परिक्षा मंडळास सादर करावेत.तसेच अशा विद्यार्थ्यांना ते ज्या शैक्षणिक वर्षात म.रा.तंत्रशिक्षण परिक्षा मंडळाच्या नियमानुसार पुढील वर्गात पात्र होतील त्या शैक्षणिक वर्षात अशा विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेत प्रवेश निश्चित करावा. तसेच विद्यार्थ्यांचे मुळ कागदपत्रे आपल्या स्तरावर तपासून घेण्यात यावेत.
४. विद्यार्थ्यांचे ओळखपत्र, तंत्रशिक्षण परिक्षा मंडळाचा एनरोलमेंट क्रमाक, सत्र परीक्षेच्या गुणपत्रीका इत्यादी तपासून तंत्रशिक्षण परिक्षा मंडळाच्या पात्रतेनुसार संबधीत वर्षात स्थलांतरीत करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश स्थलांतरीत केलेल्या संस्थेने निश्चित करण्यात यावे.

५. जे विद्यार्थी पुर्विच्या संस्थेत प्रात्याक्षिक विषयात अनुत्तीर्ण आहेत अशा विद्यार्थ्याचे पुर्विच्या संस्थेत जे सत्र कार्यपुर्ण केले आहे त्या विषयातील सत्र कार्याचा दस्ताऐवज प्राप्त करुन जतन करावा व प्रात्यक्षिक परिक्षेच्या वेळेस आवश्यकते नुसार परिक्षा घेण्यासाठी परिक्षकांना सादर करावा.

(प्रमोद अं.नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत:-

१. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहिती करीता सादर
२. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाही करीता.
३. उप सचिव, तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, मुंबई यांना माहिती करीता व पुढील कार्यवाही करीता.
४. रि वेरा इंस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, खारघर, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, त्यांनी विद्यार्थ्यांना तात्काळ आवश्यक ती गुणवपत्रीका कागदपत्रे द्यावीत. विद्यार्थ्यांनी यापूर्वी केलेले सत्र कार्य अहवाल निकालाची प्रत इत्यादी संपुर्ण तपशिलासहीत संबधित संस्थांना देण्यात यावीत व आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण अहवाल या कार्यालयास सादर करावा.
५. संबधित विद्यार्थी (सहसंचालकांच्या www.jdteromumbai.com संकेतस्थळावर उपलब्ध ) त्यांना कळविण्यात येते की त्यांनी तात्काळ संबधित स्थलांतरीत संस्थेत प्रवेश घ्यावा. कोणत्याही विद्यार्थ्यास पुनश्चः संस्थांबदल करुन देण्यात येणार नाही. संबधित संस्थेमध्ये मुदतीत प्रवेश न घेतल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील याबाबत नोंद घ्यावी.

**List of students proposed for Institute transfer from Revera Polytechnic, Kharghar to other unaided Institute in Mumbai region**

**As on 07/07/2017**

**Third Year**

| Sr. | Student Name | Branch /Sem | Enrl No. | Result Status | Branch | Allotted Institute |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Rane Shubham Dilip | 3rd Year | 1409640009 | II Class | Electronic & Tele-Communication Engineering | Bharati Vidyapeeth Institute of Tech., Belapur |
| 2 | Satve Kunal Jairam | 3rd Year | 1509640252 | Passed with ATKT | Electronic & Tele-Communication Engineering | Bharati Vidyapeeth Institute of Tech., Belapur |
| 3 | Kelkar Aaditya Sandeep | 3rd Year | 1409640010 | Passed with ATKT | Electronic & Tele-Communication Engineering | Bharati Vidyapeeth Institute of Tech., Belapur |
| 4 | Phalke Tejas Rajendra | 3rd Year | 1209640298 | Passed with ATKT | Electronic & Tele-Communication Engineering (EJ) | Anjuman-I-Islam's Abdul Razzak Kalsekar Polytechnic, Panvel, Navi Mumbai |
| 5 | Modekar Shubham Shivaji | 3rd Year | 1209640289 | Passed with ATKT | Electronic & Tele-Communication Engineering (EJ) | Anjuman-I-Islam's Abdul Razzak Kalsekar Polytechnic, Panvel, Navi Mumbai |
| 6 | Sheikh Shahid Gulfam | 3rd Year | 1409640359 | Passed with ATKT | Electronic & Tele-Communication Engineering | Zagdu Singh Charitable Trust's Thakur Polytechnic, Mumbai |
| 7 | Dhumal Jaydeep Mohan | 3rd Year | 0909640132 | Passed with ATKT | Information Technology (IF) | D. Y. Patil Polytechnic, Nerul |
| 8 | Mane Supriya Janardhan | 3rd Year | 1309640148 | Passed with ATKT | Information Technology (IF) | D. Y. Patil Polytechnic, Nerul |
| 9 | Dhavale Pratik Dilip | 3rd Year | 1309640156 | Passed with ATKT | Information Technology (IF) | D. Y. Patil Polytechnic, Nerul |

Joint Director
Technical Education (ADM)
Regional Office, Mumbai